दैनिक सत्यवादी
दि. १०/८/८९

# श्री. व्ही. टी. पाटील यांना १॥ लाखाचा गौरवनिधी अर्पण

कोल्हापूर, ता. ९ – ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक, अध्यक्ष व मौनी विद्यापीठ गारगोटीचे संस्थापक श्री. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांच्या वयाला ८९ वर्षे पूर्ण होऊन ९० व्या वर्षात पदार्पण केल्याबद्दल त्यांचा वाढदिवस समारंभ ताराराणी विद्यापीठाच्या शारदा मंदिरात साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे दैनिक सकाळचे संपादक श्री. अनंत दीक्षित होते.

प्रारंभी प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय कमला कॉलेजचे प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांनी करुन दिला. काकाजींच्या शैक्षणिक कार्याची माहिती करुन देऊन ताराराणी विद्यापीठाने जमविलेला एक लाख पन्नास हजारांचा निधी काकाजींना अर्पण करण्यासाठी त्यांनी प्रमुख पाहुणे श्री. दीक्षित यांच्याकडे दिला. तो स्विकारून काकाजींनी स्वतःचे एक हजार रुपये त्यात घालून तो ताराराणी विद्यापीठास अर्पण केला.

आपल्या वाढदिवसाच्या सत्काराला उत्तर देताना काकाजींनी "भद्रकाली ताराराणी पुरस्कारा"ची घोषणा केली. दीड लाखाच्या निधीतून भारतीय पातळीवर उत्कृष्ट ठरलेल्या महिलेचा सत्कार असे या पुरस्काराचे स्वरुप राहील. विद्यार्थिनींनी युग स्त्री ताराराणीचा आदर्श समोर ठेवून स्वयंसिद्ध व्हावे व त्यासाठी महिला विश्व-विद्यालय ताराराणी विद्यापीठातर्फे निघावे असा आशावादही त्यांनी प्रकट केला.

उषाराजे हायस्कूलने पुरस्कार-निधी दिल्याबद्दल श्री. दीक्षीत यांनी संस्थेचे आभार मानले. शेवटी प्रा. माधुरी टंकसाळे यांनी आभार प्रकट केल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे संचलन प्रा. श्रीमती व्ही. ए. माडगुळकर यांनी केले.